# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे
कार्यकारी संपादक
विजय पाटील
संपादक मंडळ
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर
मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे
अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ
मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे
व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे
प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


# आम्ही कशासाठी लढत आहोत?

*(असेम्ब्लीमध्ये बॉम्ब फेकल्यानंतर ६ जून १९२९ रोजी दिल्लीचे सेशन जज्ज लिओनिल मिडल्टन यांच्या कोर्टात भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी केलेले ऐतिहासिक निवेदन.)*

## दिल्ली कोर्टातील ऐतिहासिक जबानी

आमच्यावर गंभीर आरोप ठेवले गेले आहेत. त्यामुळे आमच्या बचावासाठी आम्ही काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे. आमच्या तथाकथित गुन्ह्यांविषयी पुढील प्रश्न उद्‌भवतात : १. असेम्ब्लीत बॉम्ब फेकले गेले होते हे सत्य आहे का? आणि हे जर सत्य असेल तर ते का फेकले गेले होते? २. खालच्या कोर्टात आमच्यावर जे आरोप ठेवले गेले आहेत ते खरे आहेत की खोटे?

पहिल्या प्रश्नाच्या पहिल्या भागाबद्दल आमचे उत्तर होकारार्थी आहे. परंतु हा प्रकार 'डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहणाऱ्या' साक्षीदारांनी जी साक्ष दिली आहे ती निखालस खोटी आहे. आम्ही बॉम्ब फेकल्याचे नाकारत नाही आणि म्हणूनच इथे या साक्षीदारांच्या जबान्यांचा खरेपणा पारखून पाहिला गेला पाहिजे. उदाहरणार्थ, आम्ही हे सांगू इच्छितो की आम्हा दोघांपैकी एकाजवळ पिस्तूल सापडले हे सार्जंट टेरीचे म्हणणे धडधडीत असत्य आहे; कारण आम्ही जेव्हा स्वेच्छेने स्वत:ला पोलिसांच्या स्वाधीन केले तेव्हा आम्हा दोघांपैकी कुणाजवळही मुळीच पिस्तूल नव्हते. आम्ही बॉम्ब फेकत असताना आम्हाला पाहिले असे ज्या साक्षीदारांनी सांगितले ते खोटे बोलत आहेत. न्याय आणि सचोटी यांवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांनी या खोट्या गोष्टींपासून धडा घेतला पाहिजे. त्याचबरोबर सरकारी वकिलांचा व्यवहार औचित्यपूर्ण होता आणि कोर्टाने आतापर्यंत आम्हाला दिलेली वागणूक न्यायाला धरून होती हे आम्ही मान्य करतो.

पहिल्या प्रश्नाच्या दुसऱ्या भागाचे उत्तर देण्यासाठी आम्हाला या बॉम्बफेकीसारख्या ऐतिहासिक घटनेचा जरा विस्तारपूर्वक परामर्श घ्यावा लागेल. आम्ही हे कृत्य कोणत्या उद्देशाने आणि कोणत्या परिस्थितीत केले याचे पूर्ण व खुल्लमखुल्ला स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

जेलमध्ये आमच्याकडे काही पोलीस अधिकारी आले होते. त्यांनी आम्हाला सांगितले की या (बॉम्बफेकीच्या) घटनेनंतर लगेच लॉर्ड आयर्विनने संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या एकत्रित अधिवेशनात सांगितले की, 'कुणा एका विशिष्ट व्यक्तीच्या विरुद्ध केलेला हा विद्रोह नाही. तर तो संपूर्ण शासनव्यवस्थेच्या विरुद्ध केलेला विद्रोह आहे.' हे ऐकून आम्ही त्वरित ताडले की आमच्या या कृत्यामागील उद्दिष्ट लोकांना खऱ्या अर्थाने समजून आले.

मानवतेवर प्रेम करण्याच्या बाबतीत आम्ही कुणापेक्षा तसूभर मागे नाही. आम्ही कुणाचाही व्यक्तिगत द्वेष करीत नाही. आम्ही सर्व प्राणिमात्रांकडे नेहमी आदरपूर्वक नजरेने पाहत आलो आहेत. स्वत:ला सोशलिस्ट म्हणवणाऱ्या दिवाण चमनलालने म्हटल्याप्रमाणे रानटी वर्तनाने देशाला कलंक लावणारे उपद्रवी लोक आम्ही नाही, किंवा लाहोरच्या 'ट्रिब्यून' आणि इतर काही वर्तमानपत्रांनी आम्ही माथेफिरू आहोत असे सिद्ध करण्याचा जो प्रयत्न केला आहे त्या प्रकारचे माथेफिरूही आम्ही नाही. स्वत:च्या देशाचा इतिहास, त्याची सद्य:परिस्थिती आणि मानवोचित आकांक्षा यांचा अभ्यास करणारे आम्ही केवळ मननशील विद्यार्थी आहोत एवढाच विनम्रतापूर्वक दावा आम्ही करू शकतो. ढोंग किंवा पाखंडीपणाचा आम्ही तिरस्कार करतो.

## एक अनर्थकारक संस्था

आम्ही हे कृत्य कोणत्याही व्यक्तिगत स्वार्थापोटी किंवा विद्वेषाच्या भावनेने केलेले नाही. ज्या शासनाच्या प्रत्येक कृतीतून त्याची अयोग्यताच नव्हे तर अपाय करण्याची क्षमतासुद्धा प्रकट होते अशा शासनसंस्थेला विरोध व्यक्त करणे एवढाच आमचा उद्देश होता. या विषयावर आम्ही जितका जास्त विचार केला तितका आमचा असा दृढ विश्वास होत गेला की जगासमोर भारताच्या लज्जास्पद आणि असहाय अवस्थेचे ढोल बडवून जाहिरात करणे एवढ्यासाठीच केवळ हे शासन तेथे आहे. हे शासन म्हणजे एक बेजबाबदार आणि निरंकुश सत्तेचे प्रतीक आहे.

जनतेच्या प्रतिनिधींनी कितीतरी वेळा आपल्या राष्ट्रीय मागण्या सरकारसमोर मांडल्या, परंतु त्या मागण्यांची सर्वथा अवहेलना करून सरकारने प्रत्येक वेळी त्या कचऱ्याच्या टोपलीत फेकून दिल्या. संसदेने पास केलेल्या गंभीर ठरावांना भारताच्या तथाकथित पार्लमेंटसमोरच तिरस्कारपूर्वक पायदळी तुडवले गेले आहे. दडपणूक

करणारे आणि निरंकुश कायदे रद्द करू पाहणाऱ्या ठरावांकडे नेहमीच अवहेलनेच्या नजरेने पाहिले गेले आहे. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी जे कायदे व ठराव लादलेले होते आणि अवैध ठरवून रद्द केले होते त्यांना केवळ लेखणीच्या फटकाऱ्याने सरकारने पुन्हा लागू केले.

थोडक्यात, या शासनसंस्थेच्या चालू अस्तित्वात काय चांगले आहे हे खूप विचार करूनही आम्हाला समजू शकले नाही. ही शासनसंस्था भारतातील कोट्यवधी कष्टकऱ्यांच्या श्रमांच्या कमाईच्या आधारे जरी डामडौल करत असली तरी ती एक केवळ दिलबहलाव करणारी, पोकळ, दिखाऊ व बदमाशपणाने भरलेली अशी संस्था आहे. आमच्या सार्वजनिक नेत्यांची मनोवृत्ती समजून घेण्यासही आम्ही असमर्थ आहोत. भारताच्या असहाय पारतंत्र्याची इतक्या उघडपणे चेष्टा करण्यामध्ये आणि पूर्वनियोजित अशा दाखवेगिरीवर सार्वजनिक संपत्ती आणि वेळ खर्च करण्यामध्ये आमची नेतेमंडळी साहाय्य का करतात ते आम्हाला कळू शकत नाही.

आम्ही या समस्यांबद्दल आणि कामगार आंदोलनाच्या नेत्यांच्या धरपकडीबद्दल विचार करत होतो, इतक्यात ट्रेड्स डिस्प्युट बिल घेऊन सरकार सामोरे आले. याच संबंधात असेम्ब्लीमधील कामकाज पाहण्यासाठी आम्ही गेलो. जी असेम्ब्ली दीनदुबळ्या श्रमिकांच्या दास्याची आणि शोषण करणाऱ्यांच्या गळाकापू शक्तीची कडवट आठवण करून देते त्या संस्थेकडून भारतातील लाखो श्रमिक लोक कोणत्याही गोष्टीची अपेक्षा करू शकत नाहीत, हा आमचा विश्वास तेथे गेल्यावर आणखीनच दृढ झाला.

ज्याला आम्ही रानटी आणि अमानुष समजतो असा तो कायदा देशाच्या प्रतिनिधींच्या माथी मारला गेला. कामगारांना अशा प्रकारे त्यांच्या प्राथमिक हक्कांपासून वंचित केले गेले आणि त्यांच्या आर्थिक मुक्तीचे एकमेव हत्यार त्यांच्या हातून हिसकावून घेतले गेले. अंग मोडून मेहनत करणाऱ्या मूक श्रमिकांच्या परिस्थितीचा ज्याने आमच्याप्रमाणे विचार केला आहे असा कुणीही माणूस शांत चित्ताने हे सर्व पाहू शकेल असे वाटत नाही. शोषकांच्या बलिवेदीवर–आणि सरकार स्वत:च सर्वात मोठा शोषक आहे–मजुरांचे दररोज होणारे ते बकऱ्यांसारखे मूक बलिदान पाहून ज्याच्या ज्याच्या आतड्याला पीळ पडतो तो माणूस स्वत:च्या आत्म्याच्या चीत्काराची उपेक्षा करू शकत नाही.

गव्हर्नर जनरलच्या कार्यकारिणी समितीचे माजी सदस्य स्वर्गीय एस. आर. दास यांनी आपल्या मुलाला लिहिलेल्या प्रसिद्ध पत्रात म्हटले होते की इंग्लंडची सुखनिद्रा भंग करण्यास बॉम्बचा उपयोग आवश्यक आहे. श्री. दास यांचे हे शब्द प्रमाण मानून आम्ही संसद भवनात बॉम्ब फेकले. कामगारांच्या वतीने बिलाचा निषेध व्यक्त करण्यासाठी आम्ही हे कृत्य केले. आपल्या जीवघेण्या यातना व्यक्त करण्यासाठी त्या निराधार मजुरांकडे दुसरे कोणतेही साधनच नव्हते. आमचा एकमेव उद्देश होता : 'बहिऱ्यांना ऐकवणे' आणि संधी मिळालीच तर या पीडित जनतेच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारला वेळ आहे तोवर इशारा देणे हे आमचे उद्दिष्ट होते.

अथांग प्रशांत सागररूपी भारतीय जनतेची ही वरवर दिसणारी शांतता म्हणजे कोणत्याही क्षणी उद्भवणाऱ्या एका भीषण तुफानाचे चिन्ह आहे. आम्ही तर फक्त येणाऱ्या भीषण संकटाची पर्वा न करता बेफाम वेगाने पुढे धावणाऱ्या लोकांसाठी (इंग्रजांसाठी) धोक्याची घंटा वाजवली आहे. 'आदर्श अहिंसे'चे युग आता संपले आहे आणि आज उदयाला येणाऱ्या नव्या पिढीला त्या 'आदर्श अहिंसे'च्या व्यर्थतेबद्दल कोणत्याही प्रकारचा संदेह उरलेला नाही, एवढेच फक्त आम्ही जनतेला सांगू इच्छितो.

मानवतेबद्दल आम्हाला हार्दिक सद्भावना आणि निस्सीम प्रेम वाटत असल्यामुळे निरर्थक रक्तपातापासून तिला वाचवण्यासाठीच केवळ इशारा देण्याकरता आम्ही हा उपाय वापरला आणि नजीकच्या भविष्यातला तो रक्तपात आम्हालाच नव्हे तर लाखो लोकांना आधीपासूनच दिसतो आहे.

## आदर्श अहिंसा

वर आम्ही 'आदर्श अहिंसा' हा शब्दप्रयोग वापरला आहे. येथे त्याची व्याख्या करणेही आवश्यक आहे. आक्रमण करण्याच्या हेतूने जेव्हा बळाचा वापर केला जातो त्याला हिंसा म्हणतात आणि नैतिक दृष्टिकोनातून त्याचे समर्थन करता येत नाही. परंतु जेव्हा एखाद्या उचित आदर्शासाठी त्याचा वापर केला जातो तेव्हा नैतिकदृष्ट्याही ते कृत्य उचित असते. कोणत्याही परिस्थितीत बलप्रयोग केला जाऊ शकत नाही हा विचार आदर्शवादी आणि अव्यवहारी आहे. गुरू गोविंद सिंग, शिवाजी, केमाल पाशा, रिजाखान, वाशिंग्टन, गॅरीबाल्डी, लाफायेत आणि लेनिन यांच्या आदर्शापासून स्फूर्ती घेऊन आणि त्यांच्या पाऊलखुणांवर पाऊल ठेवूनच भारतात उसळणारे हे नवे आंदोलन निर्माण होत आहे की ज्याची पूर्वसूचना आम्ही देत आहोत. भारतातील परकीय सरकार आणि आमचे राष्ट्रीय पुढारी दोघेही या आंदोलनाबाबत उदासीन आहेत आणि जाणूनबुजून त्यांच्या हाकांना प्रतिसाद न देता आपले कान बंद ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोत. म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही असा इशारा त्यांना देणे हे आम्ही आमचे कर्तव्य मानले.

## आमचे म्हणणे

आतापर्यंत आम्ही या घटनेमागील मूळ उद्देशावरच प्रकाश टाकला. आता आम्ही आमचे म्हणणे काय आहे हे स्पष्ट करू इच्छितो.

या घटनेमध्ये मामुली जखमा झालेल्या व्यक्तींबद्दल किंवा असेम्ब्लीमधील कुणाही दुसऱ्या व्यक्तीबद्दल आमच्या मनात थोडीही वैयक्तिक द्वेषभावना नव्हती हे सांगण्याची जरूर नाही. पण तरीही आम्ही पुन्हा एकदा स्पष्ट करतो की मानवजीवनाला आम्ही अत्यंत पवित्र मानतो आणि आम्ही दुसऱ्या कुणा व्यक्तीला इजा करण्याऐवजी मानवजातीची सेवा करता करता हसत हसत स्वत: प्राणार्पण करू. मनुष्यहत्या हेच ज्यांचे काम असते त्या साम्राज्यशाहीच्या भाडोत्री सैनिकांसारखे आम्ही नव्हेत. आम्ही मानवजीवनाची कदर करतो आणि त्याचे रक्षण करण्याचा सतत आटोकाट प्रयत्न करतो. असे असूनही आम्ही हे मान्य करतो की आम्ही जाणूनबुजून असेम्ब्लीत बॉम्ब फेकले.

आमच्या या म्हणण्यावर घटनाच प्रकाश टाकत आहे आणि आमच्या कृत्याच्या परिणामांवरूनच आमचा इरादा काय होता हे ठरवले पाहिजे. केवळ तर्काने किंवा काल्पनिक गोष्टींवरून ते ठरवले जाऊ नये. सरकारी तज्ज्ञांच्या साक्षीविरुद्ध आम्ही हे सांगू इच्छितो की आम्ही असेम्ब्लीत फेकलेल्या बॉम्बमुळे फक्त एका रिकाम्या बाकड्याची मोडतोड झाली आणि सुमारे पाच-सहा माणसांना थोडेसे खरचटले. सरकारी शास्त्रज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे बॉम्ब शक्तिमान होते तरीही त्यांच्यामुळे अधिक नुकसान झाले नाही हा चमत्कारच म्हणावा लागेल. पण आमच्या मते शास्त्रशुद्ध पद्धतीने ते बॉम्ब तसेच बनवले गेले होते. पहिली गोष्ट म्हणजे बाके आणि डेस्क्स यांच्यामधील रिकाम्या जागेत दोन्ही बॉम्ब पडले. दुसरी गोष्ट म्हणजे त्या जागेपासून दोन फुटांच्या अंतरावर बसलेल्या लोकांना–ज्यांच्यात श्री. पी. आर. राव, श्री. शंकर राव आणि सर जॉर्ज शूस्टर यांची नावे उल्लेखनीय आहेत–कोणतीही इजा झाली नाही किंवा अगदीच नाममात्र इजा झाली. सरकारी तज्ज्ञांच्या

म्हणण्यानुसार अधिक शक्तिमान असे पोटॅशियम क्लोरेट आणि पिक्रिक ॲसिड त्या बॉम्बमध्ये असते तर त्याने लाकडी कठडा तोडून त्याला काही फर्लांगांवर उभ्या असणाऱ्या लोकांपर्यंत उडवले असते. आणि जर त्याहूनही शक्तिशाली स्फोटक पदार्थ त्या बॉम्बमध्ये भरला असता तर असेम्ब्लीतील बहुतेक सभासदांना त्या बॉम्बने निश्चितच उडवले असते. एवढेच नाही, आमची इच्छा असती तर आम्ही ते बॉम्ब सरकारी कक्षात फेकू शकलो असतो. कारण ती गॅलरी खास व्यक्तींनी अगदी खच्चून भरलेली असते. किंवा आम्ही सर जॉन सायमनलाच आमचे लक्ष्य बनवले असते. कारण त्याच्या दुर्दैवी कमिशनमुळे विचार करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात त्याच्याविषयी तीव्र तिरस्कार निर्माण झाला होता आणि त्या वेळी तो असेम्ब्लीच्या अध्यक्षीय कक्षामध्ये बसलेलाही होता. परंतु आमचा असला कोणताही हेतू नव्हता आणि ज्यासाठी ते बॉम्ब तयार केले होते नेमके तेवढेच काम त्या बॉम्बने केले. तो नेमक्या ठिकाणी म्हणजे रिकाम्या असलेल्या जागीच पडला, या पलीकडे त्याने दुसरे काहीच वाईट केले नाही!

## एक ऐतिहासिक धडा

यानंतर आमच्या कृत्याबद्दल शिक्षा भोगण्यासाठी आम्ही जाणूनबुजून स्वत:ला पोलिसांच्या स्वाधीन केले. साम्राज्यवादी शोषकांना आम्ही ते सांगू इच्छितो की मूठभर लोकांना मारून कोणतेही उदात्त ध्येय गाडून टाकता येत नाही किंवा दोन य:कश्चित व्यक्तींना तुडवून टाकून राष्ट्र दडपून टाकता येत नाही. फ्रान्समधील क्रांतिकारक चळवळ दडपण्यासाठी परिचयपत्र वा परिचयचिन्ह (आयडेंटिटी कार्ड) पद्धत अथवा बॅस्टिलचा भयानक दगडी तुरुंग असमर्थ ठरला. रशियन क्रांतीची आग फाशीचे तख्त आणि सैबेरियातील हद्दपारी यामुळे विझली नाही. या इतिहासाच्या अनुभवावर लक्ष वेधण्याची आमची इच्छा होती. मग वटहुकूम आणि सुरक्षा कायदे भारतीय स्वातंत्र्याची ज्योत विझवू शकतील काय? गुप्त कटांचा तपास लावून किंवा कपोलकल्पित कट-कारस्थानांचा आधार घेऊन नौजवानांना शिक्षा ठोठावून, किंवा एका महान ध्येयाच्या स्वप्नाने प्रेरित झालेल्या नवयुवकांना तुरुंगात डांबून क्रांतीचे अभियान थोपवता येईल काय? होय, जर त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाणार नसेल तर वेळेवर दिलेल्या सार्वत्रिक इशाऱ्याने लोकांचे प्राण वाचवणे शक्य आहे आणि निरर्थक हालअपेष्टांपासून त्यांचे रक्षण करणे शक्य आहे. अशी पूर्वसूचना देण्याच्या कामाचा भार उचलून आम्ही आमचे कर्तव्य पूर्ण केले.

## क्रांती म्हणजे काय?

'तुमच्या मते क्रांतीचा अर्थ काय', असा प्रश्न भगतसिंगला खालच्या कोर्टात विचारला गेला होता. त्या प्रश्नाचे उत्तर देताना त्याने सांगितले होते की 'क्रांतीसाठी रक्तरंजित युद्ध अनिवार्य नाही, तसेच यामध्ये व्यक्तिगत प्रतिहिंसेला कसलेही स्थान नसते. क्रांती म्हणजे केवळ बॉम्ब व पिस्तुले यांचा पंथ नव्हे. आमच्या मते क्रांती म्हणजे अन्यायावर आधारलेल्या प्रचलित समाजव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन.

समाजाचे प्रमुख अंग असूनही आज कामगारांना त्यांच्या प्राथमिक हक्कापासून वंचित ठेवले जाते आणि शोषण करणारे भांडवलदार त्यांच्या निढळाच्या कमाईतून निर्माण होणारी सर्व संपत्ती हडपून टाकतात. दुसऱ्यांचे अन्नदाते असणारे शेतकरी आज सहकुटुंब एकेका दाण्यासाठी गरजवंत बनले आहेत. जगभरच्या बाजारपेठांसाठी कपडे उपलब्ध करून विणकरांना आपले व पोराबाळांचे शरीर झाकण्याइतकेदेखील कापड मिळत नाही. सुंदर महाल निर्माण करणारे गवंडी, लोहार, सुतार स्वत: मात्र घाणेरड्या झोपड्यांत राहून आपली जीवनलीला समाप्त करतात. या विपरीत समाजातील शोषक भांडवलदार छोट्यामोठ्या कारणांसाठी लाखो लोकांचे नशीब उलटेपालटे करू शकतात.

ही भयानक विषमता आणि जबरदस्तीने लादला गेलेला भेदभाव जगाला एका महाभयंकर प्रलयाकडे खेचून नेत आहे. ही स्थिती अधिक काळ टिकून राहणे शक्य नाही. हे स्पष्ट आहे की, धनिक समाज एका भयंकर ज्वालामुखीच्या तोंडावर बसून रंगेल चैनबाजी करत आहे. आणि या शोषकांची निष्पाप मुले आणि कोट्यवधी शोषित जनता भयानक दरीच्या काठावरून चालली आहे.

## आमूलाग्र परिवर्तनाची आवश्यकता

संस्कृतीचा हा प्रासाद वेळीच सावरला गेला नाही तर लवकरच चक्काचूर होऊन तो जमीनदोस्त होईल. एका आमूलाग्र परिवर्तनाची गरज आहे आणि ज्यांना ही गोष्ट उमजली आहे त्यांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी साम्यवादी सिद्धान्तावर आधारित समाजाची पुनर्निर्मिती केली पाहिजे. जोपर्यंत हे केले जात नाही आणि माणसाचे माणसांकडून होणारे शोषण किंवा ज्याला आपण साम्राज्यशाही म्हणतो ते एका राष्ट्राचे दुसऱ्या राष्ट्राकडून होणारे शोषण नष्ट केले जात नाही तोपर्यंत मानवतेची या यातनांतून सुटका होणार नाही; आणि तोपर्यंत युद्ध थांबवून विश्वशांतीचे युग निर्माण करण्याच्या सर्व गोष्टी म्हणजे निव्वळ ढोंग असण्याखेरीज दुसरे काही नाही.

क्रांतीचा आम्हाला अभिप्रेत असणारा अंतिम अर्थ असा आहे की जी वरील प्रकारच्या सर्व संकटांपासून मुक्त असलेली आणि जिच्यात सर्वहारावर्गाची अधिसत्ता सर्वमान्य असेल अशी एक समाजव्यवस्था स्थापन करणे. आणि याच्या परिणामी निर्माण होणारा विश्वसंघच पीडित मानवतेला भांडवलशाहीच्या जोखडातून मुक्त करण्यास आणि साम्राज्यवादी युद्धाच्या विनाशातून सोडवण्यास समर्थ होऊ शकेल.

## समयोचित इशारा

आमचे हे ध्येय आहे, आदर्श आहे आणि या ध्येयापासून प्रेरणा घेऊन आम्ही कळकळीचा आणि जोरदार इशारा दिला आहे. पण जर आमच्या या इशाऱ्याकडे लक्ष दिले गेले नाही आणि सध्याच्या शासनसंस्थेने उठणाऱ्या जनशक्तीच्या वाटेत अडथळे आणण्याचे काम बंद केले नाही, तर मात्र क्रांतीच्या ह्या ध्येयाच्या पूर्तीसाठी एक भयंकर युद्ध पेटणे अनिवार्य आहे. सर्व बंधनांना व अडथळ्यांना तुडवून पुढे जाणाऱ्या त्या युद्धाच्या शेवटी सर्वहारावर्गाच्या सर्वाधिकारशाहीची स्थापना होईल. ही सर्वाधिकारशाहीच क्रांतीच्या ध्येयाची पूर्ती करण्याचा मार्ग प्रशस्त बनवेल. क्रांती हा मानवजातीचा जन्मजात अधिकार आहे की जो हिरावून घेतला जाऊ शकत नाही. स्वातंत्र्य हा प्रत्येक माणसाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. खरे पाहता श्रमिकवर्गच समाजाचे पोषण करतो, जनतेच्या सर्वंकष सत्तेची स्थापना हे श्रमिकवर्गाचे अंतिम उद्दिष्ट आहे.

या ध्येयासाठी आणि या निष्ठेसाठी आम्हाला जी काही शिक्षा होईल तिचे आम्ही सहर्ष स्वागत करू. क्रांतीच्या या पूजावेदीवर आम्ही आमचे यौवन नैवेद्य म्हणून आणले आहे, कारण या महान ध्येयासाठी मोठ्यात मोठा त्यागसुद्धा कमीच आहे. आम्ही संतुष्ट आहोत आणि क्रांतीच्या आगमनाची उत्सुकतेने प्रतीक्षा करत आहोत.

इन्कलाब झिंदाबाद!

**(अनुवाद : चित्रा बेडेकर)**

# इस्राएल आणि पॅलेस्टिनची समस्या

डॉ. रमेशचंद्र पाटकर

१९४८ साली इस्राएल या ज्यू राष्ट्राची निर्मिती झाल्यापासून इस्राएल आणि पॅलेस्टाईन या दोन राष्ट्रांत संघर्षाला सुरुवात झाली. या संघर्षाला अरब व ज्यू राष्ट्रवादाची पार्श्वभूमी आहे. पॅलेस्टिनचा भूभाग बळकावून तिथे ज्यूंची वसाहत करायची, हे इस्राएलचे प्रारंभापासूनचे धोरण आहे आणि ते दोन राष्ट्रांमधील संघर्षाचे प्रमुख कारण आहे. वेस्ट बँक आणि जेरुसलेममध्ये (पूर्व जेरुसलेम हा पॅलेस्टिनचा भाग आहे आणि उरलेला भाग हा इस्राएलचा आहे) इस्राएलने बेकायदेशीरपणे आपल्या वसाहती उभारल्या आहेत. आजही नव्या वसाहती उभारल्या जात आहेत. बेकायदेशीरपणे पॅलेस्टिनचा भूभाग बळकावण्याच्या कृत्यावर जागतिक टीका झाली आहे आणि आजही होत आहे.

इस्राएल व पॅलेस्टिनच्या समस्येची सोडवणूक कशी करायची यावर संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा मंडळात कित्येक वर्षापासून चर्चा होत आहे. पण अमेरिका व त्याच्या दोस्त राष्ट्रांच्या इस्राएलला असलेल्या पाठिंब्यामुळे निष्फळ ठरत आहेत. अमेरिका वेळोवेळी आपल्या 'नकाराधिकारा'चा (व्हेटो) वापर करून इस्राएलचे संरक्षण करत आले आहे.

बेकायदेशीरपणे उभारलेल्या वसाहतींचे इस्राएल रक्षण करत आहे आणि त्याला विरोध करणाऱ्या पॅलेस्टाइनमधील जनतेवर दडपशाही करत आहे. वेस्ट बँकमध्ये इस्राएलने आतापर्यंत जवळ जवळ १९६ वसाहती बेकायदेशीरपणे उभारल्या आहेत आणि पॅलेस्टाइन जनतेवर लक्ष ठेवण्यासाठी, तपासणी करण्यासाठी मोक्याच्या ठिकाणी चौक्याही बांधल्या आहेत. बळकावलेल्या भूमीवर ३०० गृहसंकुले बांधण्याची परवानगी इस्राएलला जेरुसलेमच्या नगरपालिकेने अगदी अलिकडे दिली आहे.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (धाकटे) यांनी इस्राएलच्या अशा कृत्यांकडे डोळेझाक केली आहे. राष्ट्राध्यक्ष ओबामांची इस्राएलशी वागणूक नरमाईची होती.

इस्राएलमधील बहुतेक सरकारे उजव्या विचारसरणीची होती. पण सध्याचे बेंजामिन नेतान्याहूंचे सरकार हे अगदी कट्टर विचारसरणीचे आहे. बळकावलेल्या पॅलेस्टिनच्या भूमीत कोणतेही बांधकाम करायचे नाही असा सल्ला ओबामांनी नेतान्याहूना दिला होता. पण इस्राएलच्या पंतप्रधानांनी तो धुडकावून लावला. अमेरिकेचे राष्ट्र सचिव जॉन केरी यांची मध्यस्थीही निरुपयोगी ठरली. २०१२ साली झालेल्या निवडणुकांत पंतप्रधान नेतान्याहू यांनी ओबामांचे विरोधक मिट रोमने यांचा प्रचारही केला होता. एवढेच



नव्हे तर इराणबरोबर होणाऱ्या अण्वस्त्र करारावर ओबामांनी स्वाक्षरी करू नये म्हणून अमेरिकन काँग्रेसमधील सभासदात प्रचारही केला होता.

डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले तेव्हा इस्राएलला आनंद झाला. अमेरिकेची वकिलात आपण जेरूसलेमला हालवणार असे ट्रम्प यांनी एका प्रचारसभेत जाहीर केले, तेव्हा 'ट्रम्प' हे अमेरिकेच्या इतिहासातील सच्चे इस्राएलधार्जिणे राष्ट्राध्यक्ष आहेत' असे प्रशंसापर उद्‌गार पंतप्रधान नेतान्याहू यांनी काढले. नॅफ्ट बेनेट हे इस्राएलचे शिक्षणमंत्री आहेत. 'ट्रम्प हे इस्राएलचे सच्चे दोस्त आहेत' अशा शब्दात त्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. इस्राएलने वेस्ट बँकमधील ६० टक्के भूभाग व्यापला आहे, तो कायदेशीर करावा असे बेनेट सतत सांगत आले आहेत. ट्रम्प यांच्या विजयामुळे पॅलेस्टिन राष्ट्राचे युग संपुष्टात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली. ट्रम्प यांनी इस्राएल धार्जिणे डेव्हीड फ्रिडमन यांची इस्राएलचे राजदूत म्हणून नेमणूक केली. इस्राएलने वेस्ट बँकेचा भूभाग आपल्या ताब्यात घेतला म्हणून त्यांनी समाधान व्यक्त केले आणि पॅलेस्टिनला संपूर्ण राष्ट्राचा दर्जा मिळावा म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर जे प्रयत्न होत आहेत त्याला आपला विरोध असल्याचे त्यांनी सांगितले. मुस्लिम व ख्रिश्चन बांधवासाठी जेरुसलेम ही अत्यंत पवित्र भूमी आहे. पण जेरूसलेम ही फक्त ज्यूंची पवित्र राजधानी आहे, अशी भूमिका बेनेट यांनी घेतली आहे.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याकडे पॅलेस्टिन संशयाने पाहते; कारण त्यांना ज्यूवाद्यांचा मिळालेला पाठिंबा. जिराड कुशनर हा ट्रम्पचा जावई. तो आता सल्लागार बनला आहे. कुशनरच्या वडिलांनी उजव्या विचारसरणीच्या गटाला फार मोठ्या देणग्या दिल्या आहेत. एवढेच नव्हे तर वेस्ट बँकमध्ये उभारल्या गेलेल्या वसाहतींना त्यांनी आर्थिक मदत केली आहे. ट्रम्पनी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्यावर इस्राएल सरकारने जेरुसलेम आणि वेस्ट बँकमध्ये आणखी वसाहती उभारायची योजना जाहीर केली.

पॅलेस्टिनमध्ये बेकायदेशीरपणे उभारलेल्या वसाहती कायदेशीर करण्याचे नवे विधेयक इस्राएलच्या लोकसभेने फेब्रुवारीमध्ये मंजूर केले, नेतान्याहूंच्या पूर्वी मंत्रिमंडळात असलेल्या डॅन मेरिडर यांनी विधेयकाचे वर्णन 'दुष्ट व धोकादायक' अशा शब्दांत केले आहे. आयझॅक हरगॉझ या विरोधी पक्षाच्या नेत्याने म्हटले आहे की नेतान्याहू आणि त्यांच्या सहकाऱ्यांना 'आंतरराष्ट्रीय गुन्हेगार न्यायालयात' (आयसीसी) खेचण्याची संधी या विधेयकाने निर्माण केली आहे.

*(पान ९ पहा)*

# पीक विमा : नक्की घोडे अडले कोठे?

डॉ. अजित नवले

प्रधानमंत्री पीक विमा योजनेची घोषणा होऊन वर्षभराचा कालावधी पूर्ण झाला आहे. १ ३ जानेवारी २ ० १ ६ रोजी या योजनेची घोषणा झाली. खरीप हंगाम २ ० १ ६ पासून राज्यात योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. आताच्या रब्बी हंगामातही योजना राबविली जात आहे. योजना जाहीर करताना ही योजना शेतक-यांचे समग्र जीवनच बदलून टाकेल असा दावा केला गेला होता. आज वर्ष उलटून गेले असताना हा दावा, प्रत्यक्षातील वास्तव व शेतक-यांच्या अपेक्षा यांचे काय झाले हे तपासून पाहणे आवश्यक आहे.

देशभरातील शेतकरी दुष्काळ, गारपीट, चक्रीवादळ, पूर, भूस्खलन, पावसातील खंड, कीड व रोगाच्या साथी यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे हैराण आहेत. शेतकऱ्यांना अशा सर्व आपत्तीमध्ये नवी पीक योजना संरक्षण देईल असा दावा करण्यात आला. स्वाभाविकपणे त्यामुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या गेल्या.

खरीप हंगाम २ ० १ ६ मध्ये त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने योजनेत आपला सहभाग नोंदविला. योजना कालावधीत पाऊस चांगला झाल्याने दुष्काळाचा सामना करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली नाही. काही ठिकाणी मात्र मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. अनेक ठिकाणी धरणे व जलसाठे भरून फुटून वाहिले. परिणामत: शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरून त्यांच्या पिकांचे व शेतीचे मोठे नुकसान झाले. अतिवृष्टीने शेतात अनेक दिवस पाणी साठल्याने व पाण्याचा निचरा तत्काळ न झाल्यानेही पिकांचे नुकसान झाले. आता अशा आपत्तीत आपल्याला पीक विम्याचे संरक्षण मिळेल अशी आशा शेतकरी बाळगून होते. घोषणेप्रमाणे नुकसानीचा अहवाल प्राप्त झाल्यापासून पुढील ३ ० दिवसांच्या आत नुकसानभरपाईची त्यांना आशा होती. प्रत्यक्षात मात्र तसे काहीच झाले नाही. शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग झाला.

## नैसर्गिक आपत्ती

नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतक-यांना सरकार वेळोवेळी आर्थिक मदत करत असते. अनेकदा आणेवारीनुसार ही मदत ठरविण्यात येते. सरकारच्या या मदतीलाच आपल्याकडे नुकसानभरपाई म्हणण्याचा प्रघात आहे. शब्दश: या आर्थिक मदतीला नुकसानभरपाई म्हणणे चुकीचे आहे. ते सहाय्य असते भरपाई नसते. ज्याने नुकसान केले आहे किंवा कशाच्या तरी बदल्यात ज्याने नुकसानीच्या भरपाईची हमी घेतली आहे, अशाने भरपाई देणे अपेक्षित असते. येथे नुकसान पावसाने किंवा दुष्काळाने केलेले असल्याने भरपाई सरकारने देण्याचा प्रश्न नसतो. सरकारच्या विविध धोरणांचा विपरीत परिणाम शेतक-यांवर होत असतो. त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून सरकारने अशी मदत करावी असे येथे अपेक्षित असते. कायदेशीर हक्क किंवा जबाबदारीचे स्वरूप या मदतीला असत नाही. अटीशर्तींचा काटेकोरपणाही येथे नसतो.

विमा योजनेच्या संदर्भात मात्र असे नसते. विमा हप्त्याच्या बदल्यात नुकसानभरपाईच्या दायित्वाचा तो एक करार असतो. करारातील तरतुदींच्या अधीन राहूनच हे दायित्व निश्चित होते. ही प्रक्रिया सहाय्य नसते. ते कराराचे निर्वाहन असते. सहाय्य व करार या मधील हा व्यावहारिक फरक समजून न घेता आपण अपेक्षा ठेवल्यास, पदरात अपेक्षाभंगच येणार असतो. असा अपेक्षाभंग होऊ नये यासाठी, योजनेतील नुकसानभरपाई बाबतच्या नक्की तरतुदी काय आहेत हे समजून घेणे आवश्यक आहे. न्याय मिळविण्यासाठी व योग्य बदलांचा आग्रह धरण्यासाठी सुद्धा ते आवश्यक आहे.

सरकारने प्रचारात काहीही म्हटले असले तरी, प्रत्यक्षात योजनेत नैसर्गिक आपत्तीमध्ये सरसगट सर्वांना भरपाई देण्याची कोठेही तरतूद करण्यात आलेली नाही. सरकारच्या परिपत्रकात नैसर्गिक आपत्तीचे चार संदर्भाने वर्गीकरण करण्यात आले आहे.

### १) हंगामातील प्रतिकूल परिस्थिती :

परिपत्रकानुसार विमा काळात प्रतिकूल हवामान जसे पूर, पावसातील खंड किंवा दुष्काळ यामुळे पिकाच्या उत्पादनात उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत पन्नास टक्यांपेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर नुकसानभरपाईच्या प्रमाणात विमाधारक शेतकऱ्यांना २५ टक्के मर्यादेपर्यंत रक्कम आगाऊ देणे अपेक्षित आहे. ही रक्कम अंतिम नुकसानभरपाईतून वजा केली जाणार असल्याने एक प्रकारे ती अंतिम नुकसानभरपाईचा भागच आहे. ही स्वतंत्र अशी वेगळी भरपाई नाही. केवळ थोडी आगाऊ दिलेली रक्कम आहे.

### २) नापेर किंवा नापिकी

अपुरे पर्जन्यमान किंवा हवामानातील घटकांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे अनेकदा शेतक-यांना नापेरीचा किंवा नापिकीचा सामना करावा लागतो. विमा योजनेत अशा आपत्तीपासून शेतकऱ्यांना संरक्षण देण्यात आल्याचे सांगितले गेले. प्रत्यक्ष योजनेत मात्र सर्व पिकांना अशा प्रकारच्या संरक्षणाची सरसकट तरतूद करण्यात आलेली नाही. केवळ निवडक पिकांना, निवडक परिमंडळातच असे संरक्षण देण्यात आले आहे. त्यातही अशा परिमंडळात एकूण क्षेत्राच्या तुलनेत ७५ टक्के क्षेत्रावर पेरण्या होऊ न शकल्यास किंवा पेरण्या होऊनही ७५ टक्के क्षेत्रावर उगवण न झाल्यासच सदरची तरतूद संबंधित परिमंडळापुरती लागू असणार आहे. विमा योजनेची अधिसूचना पेरणीवेळेच्या अगोदर जाहीर झाली असल्यासच ही तरतूद लागू होईल. त्यातही अशी तरतूद लागू झाल्यावर बाधित शेतक-यांना विमा संरक्षित रकमेच्या केवळ २५ टक्केच नुकसानभरपाई दिली जाणार आहे. एकदा अशी २५ टक्के भरपाई दिल्या नंतर त्या पिकाचे विमा संरक्षण संपुष्टात येणार आहे. विमा हप्ता शंभर टक्के घेतला असताना व नुकसानही शंभर टक्के झाले असताना अशा प्रकारे भरपाई मात्र केवळ २५ टक्केच मिळणार आहे.

### ३) स्थानिक आपत्ती

पुराचे पाणी शेतात शिरून पिकांचे नुकसान झाल्यास किंवा गारपीट, भूस्खलन यासारख्या स्थानिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास या

तरतुदी अंतर्गत भरपाई देणे अपेक्षित आहे. मात्र अशी भरपाईही जोखमीचा धोका घडेपर्यंत पिकांच्या लागवडीसाठी लागलेल्या निविष्टांच्या खर्चाच्या प्रमाणातच मिळणार आहे. म्हणजेच केवळ बियाणे, खते यांचा झालेला खर्च दिला जाणार आहे. ही रक्कम विमा संरक्षित रकमेपेक्षा अधिक असू शकणार नाही. आपत्तीमुळे शेतजमिनीच्या, बांधबंदिस्तीच्या नुकसानीचीही कोणतीही भरपाई या अंतर्गत मिळणार नाही.

## काढणी पश्चात नुकसान भरपाई

पीक काढणी नंतर चक्री वादळ किंवा अवकाळी पावसाने पिकाचे नुकसान झाल्यास या तरतुदीनुसार नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. केवळ निवडक पिकांना निवडक परिमंडळातच काढणी पश्चात केवळ १४ दिवस हे संरक्षण असणार आहे.

वरील तरतुदी पाहता शेतक-यांच्या अपेक्षा, सरकारची आश्वासने आणि प्रत्यक्ष वास्तव यातील विसंगती स्पष्ट होतात. अंमलबजावणीतही या विसंगतींचे प्रतिबिंब पडलेले दिसते. विमा काळात २०१६ च्या खरीप हंगामात दुष्काळ नव्हताच. अतिवृष्टीचा सामना मात्र शेतक-यांना करावा लागला होता. अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे मोठे नुकसान झाले होते. विमा योजनेत मात्र अतिवृष्टी या आपत्तीचा उल्लेखच नसल्याने शेतकऱ्यांना नुकसान होऊनही भरपाई मिळू शकली नाही. योजना काळात पावसात खंड पडल्याने शेतकऱ्यांनी भरपाई मागितली. मात्र पावसातील खंड म्हणजे काय ? याबाबत स्पष्टता नसल्याने या बाबतही अद्याप भरपाई देण्यात आलेली नाही.

आपत्तीमध्ये भरपाईसाठी शेतक-यांनी विहित नमुन्यात अर्ज करणे अपेक्षित आहे. अर्ज प्राप्त झाल्यापासून नुकसानीचे मूल्यांकन करण्यासाठी विमा कंपनीने ४८ तासाच्या आत पर्यवेक्षकाची नियुक्ती करावी. पुढील १० दिवसाच्या आत नुकसानीचा अहवाल तयार करावा व अहवाल प्राप्त झाल्यापासून पुढील ३० दिवसाच्या आत नुकसानभरपाई द्यावी असेही तरतुदीनुसार अपेक्षीत आहे. आपत्तीच्या वेळी मात्र असा अर्ज करावा लागतो हेच अनेक शेतकऱ्यांना माहित करण्यात आले नाही. अर्ज नमुने उपलब्ध करण्यात आले नाहीत. ज्यांनी अर्ज केले त्यांनाही ३० दिवस सोडाच आज अनेक महिने उलटून गेले तरी भरपाई देण्यात आलेली नाही.

सरकारी परीपत्रकात दुष्काळ कशाला म्हणायचे, पावसातील खंड म्हणजे नक्की काय, पुराचे किती पाणी शेतात आल्यावर तरतूद लागू असेल यासारख्या असंख्य बाबी अस्पष्ट ठेवण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांनी या बाबी अंतर्गत भरपाईची मागणी केल्यास कंपन्यांना पळवाटा काढता याव्यात यासाठीच या संदिग्धता ठेवण्यात आल्या असल्याची साधार शंका आहे.

## आक्षेपांची दखल

शेतकऱ्यांचे योजनेसंदर्भात वरीलप्रमाणे अनेक आक्षेप आहेत. कोणत्याही विमा योजनेमध्ये अशा आक्षेपांची दखळ व क्लेम सेटलमेंटही पूर्ण पद्धतीने ही प्रक्रिया पार पडणे अपेक्षित असते. योजनेचे यश-अपयश यावरच अवलंबून असते. आक्षेपांची योग्य दखल घेण्यासाठी त्यामुळे स्वतंत्र, त्रयस्त व न्यायपूर्ण यंत्रणा आवश्यक असते. योजनेत मात्र अशी कोणतीही त्रयस्त यंत्रणा उभी करण्यात आलेली नाही. प्रशासकीय अधिकारी व विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींवरच ही जबाबदारी टाकण्यात आली आहे. ज्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा करता येण्याजोगी परिस्थिती नाही.

## भरपायीचे दायित्व

नुकसानभरपाईचे दायित्व संपूर्णपणे विमा कंपन्यांवर असणे आवश्यक असताना या योजनेत मात्र एकूण जमा विमाहप्ता रकमेच्या ३.५ पट किंवा एकूण विमा संरक्षित रक्कमेच्या ३५ टक्के यापैकी जी रक्कम जास्त असेल तेवढीच नुकसानभरपाई ही संबंधित विमा कंपनी मार्फत दिली जाणार आहे. या रकमेपेक्षा जास्त रक्कम नुकसानभरपाई म्हणून देण्याची वेळ आल्यास अशा जादा रकमेची जबाबदारी सरकारवर टाकण्यात आली आहे. केंद्र राज्य सरकारने निम्मी निम्मी विभागून ही जादाची रक्कम सोसायची आहे. सरकारचा पैसा म्हणजे अंतिमत: जनतेचाच पैसा असतो. खाजगी कंपन्यांना पोसण्यासाठी तो अशा प्रकारे वापरला जाणार आहे. शिवाय गत वर्षी २०१६-१७ साठी केंद्रीय स्तरावर या योजनेसाठी १३,२४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात मात्र ती कमी करून ९००० कोटी रुपयांवर आणण्यात आली आहे. तरतुदीतील ही कपातही भय सुचकच आहे.

## नुकसान निश्चिती

पीक विमा योजनेत पीक नुकसान निश्चितीसाठी नव्या तंत्रज्ञानाचा मोठया प्रमाणात वापर केला जाणार असल्याचे वारंवार सांगण्यात आले. पिकांच्या नुकसानीचे योग्य मोजमाप न झाल्याने व नुकसान ठरविण्याच्या प्रक्रियापद्धतीत पारदर्शकता व विश्वासार्हता न राहिल्याने आजवरच्या योजना केवळ कंपन्यांना लाभदायी ठरल्याचा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. नव्या योजनेत तंत्रज्ञानाच्या मदतीने ही कमतरता दूर केली जाण्याची आशा निर्माण झाली होती. प्रत्यक्षात मात्र यासाठी आवश्यक असलेले आधुनिक तंत्रज्ञान, संगणक आज्ञावली, उपकरणे व प्रशिक्षित कर्मचारी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने बहुतांश पीक कापणी प्रयोग जुन्याच पद्धतीने करण्यात आले आहेत. उंबरठा उत्पन्नावरून नुकसान निश्चिती करण्याची जुनी सदोष पद्धत तशीच सुरु ठेवण्यात आली आहे. परिणामी यावेळीही शेतकरी रास्त नुकसानभरपाई पासून वंचितच राहणार आहेत.

## हवामानाधारित निकष

हवामानाधारित फळ पीक विमा योजनेत निवडक परिमंडळात निवडक फळ पिकांना मर्यादित दिवसांसाठी विमा संरक्षण देण्यात येते. बहार व फलधारणा काळात पाऊस व आर्द्रता यातील बदलांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई या अंतर्गत देण्यात येते. पावसाचे प्रमाण, वेळ आर्द्रता आदी प्रमाणकांच्या आधारे या अंतर्गत नुकसानभरपाई निश्चित केली जाते. रास्त नुकसान निश्चितीसाठी या प्रमाणकांची अचूक नोंद आवश्यक असते. प्रत्यक्षात मात्र अशा विश्वासार्ह नोंदीच्या पुरेशा यंत्रणा उपलब्ध नाहीत. ज्या आहेत त्यातील अनेक सदोष आहेत. त्यातून जी माहिती गोळा होते त्यातही संशयास्पद छेडछाड होत असते. परिणामी हवामानातील बदल व त्यामुळे होणारे पिकांचे नुकसान याचे रास्त मुल्यांकन होत नाही. शेतकऱ्यांना भरपाई मिळणे दुरापास्त होते. योजना केवळ कंपन्यांच्या फायद्याची बनून जाते.

## आवश्यकता

वरील सर्व मुद्यांच्या अनुषंगाने योजनेतील या त्रुटी दूर करण्याची व तरतुदींमध्ये अनेक बदल करण्याची आवश्यकता आहे. योजना अधिकाधिक परिपूर्ण व्हावी यासाठी म्हणूनच

१. निवडकच पिकांना निवडकच परिमंडळात संरक्षण न देता शेतीमध्ये येणा-या सर्व पिकांना सर्वत्र विमा संरक्षण द्यावे.

२. नैसर्गिक आपत्तीमध्ये अंतिम नुकसानभरपाई व्यतिरिक्त अधिकच्या आर्थिक सहाय्याची तरतूद करावी.

३. भरपाई देण्याचे टाळण्यासाठी वापरण्यात येणा-या पळवाटांना अटकाव करण्यासाठी दुष्काळ, पूर, गारपीट यासारख्या बाबींच्या सुस्पष्ट व्याख्या कराव्यात.

४. नापेर व नापिकीच्या आपत्तीमध्ये संपूर्ण विमा संरक्षित रकमे इतकी १०० टक्के भरपाईची तरतूद करावी.

५. पूर, भूस्खलन, गारपीट, अतिवृष्टी यासारख्या आपत्तीमध्ये पिकांच्या, जमीनीच्या व बांध बंदिस्तीच्या नुकसानीची संपूर्ण भरपाई द्यावी.

६. भरपाई दायीत्वाची संपूर्ण जबाबदारी विमा कंपनीवर द्यावी व विमा हप्त्याचा सरकारी भाग पेलण्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करावी.

७. क्लेम सेटलमेंट व आक्षेपांची योग्य दखल घेण्यासाठी स्वतंत्र, त्रयस्त व न्यायपूर्ण यंत्रणेची उभारणी करावी.

८. नुकसान निश्चितीसाठी प्रत्येक परीमंडळात आधुनिक हवामान नोंदणी केंद्रांची उभारणी करावी, हवामानाच्या नोंदी दररोज सरकारी संकेत स्थळांवर प्रकाशित करून त्यात पारदर्शकता आणावी.

९. पीक उत्पादन व नुकसान निश्चितीसाठी आधुनिक पद्धतींचा व तंत्रज्ञानाचा अवलंब करावा.

१०. शेतीमालाच्या साठवण व वाहतूक काळात होणा-या नुकसानीलाही विमा संरक्षण द्यावे.

११. पीक विम्याबरोबरच शेतकऱ्यांच्या कुटुंबाला व पशुधनाला आरोग्य व जीवन विम्याचे पुरेसे संरक्षण द्यावे.

शिवाय शेतकरी आज जितके नैसर्गिक आपत्तीने हैराण आहेत तितकेच ते शेतीमालाच्या कोसळत्या बाजारभावामुळेही हैराण आहेत, ही बाब समजून घेत बाजारभावाच्या चढ-उतारापासूनही शेतकऱ्यांना संरक्षण मिळण्यासाठी ठोस तरतूद करावी. संरक्षणास खरे पूर्णत्व आणण्यासाठी या सर्व उपायांची आवश्यकता आहे.

★ ★ ★

## (इस्त्राएल आणि पॅलेस्टिन... पान ६ वरून)

संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा मंडळात(युएनएससी) इस्त्राएलच्या विरोधात एक ठराव मांडला गेला होता. पॅलेस्टिनची जमीन बेकायदेशीरपणे बळकावण्याच्या संदर्भात हा ठराव होता. पण त्यावर चर्चा होऊ नये म्हणून इस्त्राएल सरकारने बंदोबस्त केला.

इस्त्राएल व पॅलेस्टिन ही दोन स्वतंत्र राष्ट्रे असावीत, या दृष्टीने त्यांच्या समस्येकडे पाहिले जात होते. पण इस्त्राएलला आपले एकच राष्ट्र असावे, पॅलेस्टिनचे स्वतंत्र अस्तित्व असू नये, असे इस्त्राएलचे धोरण होते आणि आजही याच धोरणाचा पाठपुरावा तो करत आहे. ट्रम्प राष्ट्राध्यक्ष असल्यामुळे आपल्या धोरणाला पाठिंबा मिळेल याची पंतप्रधान नेतान्याहूना खात्री वाटत आहे. पॅलेस्टिनची भूमी इस्त्राएलने बळकावली आहे आणि तिथे वसाहती बांधल्या जाणार आहेत असे त्यांनी वॉशिंग्टनमध्ये भरलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले होते; कारण हा प्रश्न आता महत्वाचा राहिलेला नाही. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना त्याची जाणीव आहे आणि लवकरच ट्रम्प दोन स्वतंत्र राष्ट्रापेक्षा इस्त्राएल हे एकच राष्ट्र असावे अशा निष्कर्षाला ते येतील यावर आपला विश्वास आहे, असेही त्यांनी प्रतिपादन केले होते. 'अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांकडून नेत्यान्याहू यांना जे हवे ते मिळेल' असे इस्त्राएलचे पत्रकार सीमा कॅडयॉन यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नेतान्याहू यांना भेटायला ट्रम्प यांना वेळ मिळाला, पण त्यांना भेटायला आलेल्या पॅलेस्टिनच्या शिष्टमंडळाला वेळ मिळाला नाही. ट्रम्प यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या अमेरिकेच्या राष्ट्रांध्यक्षांना पॅलेस्टिनचे राष्ट्राध्यक्ष महमोद अब्बास यांच्याशी बोलणी करायला बराच वेळ मिळाला होता.

इस्त्राएलने बळकावलेल्या प्रदेशातील पॅलेस्टिनींना मानवी हक्काखाली २२१ मिलियन डॉलर्स एवढी मदत मिळायची. पण ट्रम्प यांच्या प्रशासनाने ती द्यायचे आता थांबवले आहे. आपल्या देशाला संपूर्ण राष्ट्राचा दर्जा मिळेल असा विश्वास पॅलेस्टिनी नेतृत्वाला वाटत होता. पण पॅलेस्टिनच्या प्रश्नावर झालेल्या परिषदेत 'एक राष्ट्र'च्या मुद्याला अधिक महत्व मिळाले. पॅलेस्टिनी भूमीवर इस्त्राएलने ज्यूंच्या वसाहती उभारून आपल्या देशाच्या केलेल्या विस्ताराला पाठिंबा दिला गेला. त्यामुळे 'ओस्लो करारा'तील 'दोन राष्ट्रा'च्या तत्वाला तडा गेला. युरोपियन युनियनच्या काही सभासद राष्ट्रांनी मात्र 'दोन राष्ट्रा'च्या संकल्पनेला दुजोरा दिला, असे असले तरी इस्त्राएल 'दोन स्वतंत्र राष्ट्रा'च्या संकल्पनेला तिलांजली देऊन पॅलेस्टिनची भूमी गिळंकृत करण्याचे धोरण यापुढेही राबवेल असे हनान अॅश्रवाई या पॅलेस्टिनच्या बुजुर्ग राजदूताने म्हटले आहे. इस्त्राएलने आतापर्यंत पॅलेस्टिनची ७८ टक्क्याहून जास्त भूमी बळकावली आहे.

इस्त्राएलने वेस्ट बँक आणि जेरूसलेमचा जो भूभाग बळकावला आहे त्यात ७५०,००० ज्यू राहात आहेत. संयुक्त राष्ट्र संघाच्या अंदाजानुसार इस्त्राएलने आपल्या कब्जात घेतलेल्या पॅलेस्टिनींना हुसकावून लावले आहे. इस्त्राएलने पॅलेस्टिनच्या भूमीत ज्यूंच्या ज्या वसाहती उभारल्या आहेत त्याचा निषेध करणारा एक ठराव सुरक्षामंडळाने मंजूर केला असून 'आंतरराष्ट्रीय कायद्याचे ते ढळढळीत उल्लंघन' आहे असे स्पष्टपणे म्हटले आहे.

इस्त्राएल विरुद्धचा कोणताही ठराव मंजूर होऊ नये म्हणून अमेरिकेने प्रत्येक वेळी 'नकाराधिकारा'चा उपयोग केला आहे. पण ओबामाच्या प्रशासनाने हा मोडला असून इस्त्रायलवर सौम्य शब्दांत टीका केली होती. ओबामांचे राज्य सचिव जॉन केरी यांनी इस्त्राएलला दिलेल्या भेटीत त्याच्या 'एक राष्ट्रा'च्या धोरणाचा कडक शब्दात समाचार घेतला. पण नवे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ह्याला जाहीरपणे पाठिंबा दिला आहे, याचा अर्थ आतापर्यंत इस्त्राएलने पॅलेस्टिनचा बेकायदेशीरपणे व्यापला आहे तो भूभाग पॅलेस्टिनला परत मिळण्याची शक्यता जवळ जवळ नाही असे म्हणता येईल. इस्त्राएल व पॅलेस्टिनची समस्या डोनाल्ड ट्रम्पच्या पाठबळाने आता कशी सोडवली जाईल याचा अंदाज बांधायला हरकत नाही. पॅलेस्टिनींना आपल्या मायभूमीला पारखे व्हावे लागण्यासारखे दुसरे दु:ख नाही.

★ ★ ★

# मोदी सरकारची 'नोटाबंदी': चलनविहीन समाजाच्या दिशेने वाटचाल (भाग ३)

## चलनविहीन अर्थव्यवस्था किंवा 'डिजिटल' अर्थव्यवस्था - आंतरराष्ट्रीय वित्तीय मंडळाला नफ्याची ग्वाही

''कागदी चलन कमी करून आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणात पर्यायी 'डिजिटल' पद्धतीद्वारे किंवा 'चेक' मार्फत केले जावेत, हा भारत सरकारचा नोटाबंदी लागू करण्यामागचा अर्थातच एक उद्देश आहे'' असे वित्तमंत्री अरुण जेटली यांनी आधी ८ डिसेंबर २०१६ रोजी व त्यानंतर पुन्हा २९ डिसेंबर २०१६ रोजी जाहीर केले होते. भारतात रोखीच्या अर्थव्यवस्थेचे रूपांतर चलनविहीन अर्थव्यवस्थेमध्ये करण्यासाठी २०२० पर्यंत ५०० बिलीअन डॉलर्सच्या मूल्याची म्हणजे ३.४०३५ लाख कोटी रुपयाची भारतीय बाजारपेठ उपलब्ध असेल असा अंदाज बांधण्यात आला आहे. ही बाजारपेठ आहे - 'Visa', 'Mastercard' यासारख्या क्रेडिट कार्ड कंपन्यांसाठी; तसेच अनेक आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांसाठी अशा या मोठ्या बाजारपेठेमुळेच 'युएसए' व 'चीन' हे दोन्ही देश डिजीटल वित्तीय व्यवहारांमध्ये प्रचंड गुंतवणूक करीत असल्याचे आपण पहातो.

आपल्या देशात नोटाबंदीची घोषणा केल्यानंतर लगेच मोदी सरकारच्या या कारवाईचे स्वागत करण्यात 'Visa' आणि 'Mastercard' या दोन्ही कंपन्यांचा पहिला नंबर होता. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेत हा बदल घडवून आणण्यासाठी दोन्ही कंपन्या प्रयत्नांची शिकस्त करीत असल्याचे प्रसारमाध्यमांच्या नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी आलेल्या वृत्तांतावरून स्पष्ट होत होते. वास्तविकत: यात आश्चर्यजनक असे काहीच नव्हते. कारण या दोन्ही कंपन्यांच्या पदरात नोटाबंदीमुळे भले मोठे घबाड पडले होते. काही बातम्यांनुसार नोटाबंदीच्या दरम्यान 'Mastercard' कंपनीची १.५८ कोटी डेबिट कार्डे वापरात होती व १ नोव्हेंबर २०१६ ते ९ नोव्हेंबर या कालावधीत वापरलेल्या डेबिट कार्डच्या संख्येत ७६.८४ टक्क्यांनी ही वाढ झाली होती. 'Mastercard' कंपनीच्या क्रेडीट कार्ड व्यवहारात अंदाजे २४ टक्क्यांनी वाढ होऊन ही देवघेव ५७.३१ लाखापर्यंत पोहचली. 'Visa' कंपनीच्या बाबतीत डेबिट व आगाऊ रक्कम दिलेले आर्थिक व्यवहार (Pre-paid Transaction Fee) यामधील वाढ ९३ टक्के इतकी होती' आपण खरेदी केलेल्या व वापरात असलेल्या प्रत्येक कार्डामागे मिळते. 'Visa' आणि 'Mastercard' या दोन अमेरिकन कॉर्पोरेट कंपन्यांना २-३ टक्के देवाण घेवाण शुल्क (Transaction Fee) याचा अर्थ आपण किती कोटी रुपये अमेरिकेच्या खिशात ओतत आहोत व स्वत: कोरडे होत चालले आहोत याची कल्पना करा!

तसेच या काळात 'पेटीएम' (PAYTM)च्या उपयोगकर्त्यांची संख्या १७ कोटीहून अधिक झाली व ही मंडळी PAYTMला प्रचंड नफा मिळवून देत आहेत. गेल्या दोन महिन्यात आपला 'धंदा' वाढल्याचे 'पेटीएम'ने स्वत:च जाहीर केले आहे. दरदिवशी 'पेटीएम' मार्फत ७० लाखांची देवाणघेवाण होते. जवळजवळ २५० टक्क्यांनी हा व्यवहार वाढला आहे. बेफाम नफा कमविण्याच्या या अशा मुबलक संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मोदी सरकारचे जणू आभार मानण्यासाठी म्हणून की काय, मोदींचे छायाचित्र 'पेटीएम'च्या जाहिरातींना दिमाखाने सुशोभित करीत आहे.

'पेटीएम्'बरोबर इतर 'डिजिटल वॉलेट' (Digital Wallet) कंपन्यासुद्धा मैदानात उतरल्या होत्या. जपानी गुंतवणूकदारांच्या वर्चस्वाखालील 'Mobikwik' ही 'डिजिटल वॉलेट' कंपनी आणि 'Tree Line Asia' सारख्या 'Hedge Fund' कंपन्यांनी याच काळात आपला व्यवसाय वाढविण्यासाठी १५५ कोटी रुपये उभे केले होते; अमेरिकन एक्सप्रेस, सिस्को व काही चीनी गुंतवणूकदार यांच्या प्रभुत्वाखालील या 'Freecharge' या डिजिटल वॉलेट कंपनीने आपला प्रत्येक दिवसाचा आर्थिक व्यवहार १२ पटीने वाढल्याचे नमूद केले होते.

भारत सरकारने या अगोदर 'USAID', 'Visa', 'Mastercard', 'Citi' व इतर अनेक कॉर्पोरेट कंपन्यांबरोबर भागीदारीचा उद्योगधंदा सुरू केला होता. या गटाला 'Better than Cash Alliance' असे नाव देण्यात आले होते.

एक गटसभासद या नात्याने USAIDने जुलै-सप्टेंबरच्या दरम्यान आपल्या देशात एक संशोधनात्मक सर्वेक्षण केले होते. कमी मासिक उत्पन्न असलेल्या ग्राहकांना पैसे भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात 'डिजिटल पद्धतीचा वापर करण्यास प्रवृत्त करणे व त्यासाठी पार्श्वभूमी तयार करणे, हा या सर्वेक्षणाचा उद्देश होता. या सर्व तपशीलावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की, नोटाबंदीची घोषणा जरी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी करण्यात आली. तरी त्या आधी काही महिन्यांपासून 'कॅशलेस' किंवा डिजिटल अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी मोदी सरकार जंगी तयारीला लागले होते.

> २०१५-१६चे केंद्रीय अंदाजपत्रक सादर करताना वित्तमंत्री म्हणाले होते, 'रोखीच्या व्यवहारापासून जनतेला परावृत करणे हा काळा पैसा नष्ट करण्याचा एक मार्ग आहे. बहुतांश भारतीयांकडे आज 'Rupay' डेबिट कार्ड असल्यामुळे किंवा असे कार्ड घेणे त्यांना शक्य असल्यामुळे व क्रेडिट कार्डामार्फत आर्थिक व्यवहारांना उत्तेजन मिळेल असे, आणि नगदी व्यवहार बंद होतील असे, अनेक उपाय लवकरच सुरू करण्याचा प्रस्ताव मी मांडीत आहे.'

एवढेच नव्हे तर, इलेक्ट्रॉनिक आर्थिक व्यवहार सुलभ करण्यासाठी मांडण्यात आलेल्या प्रस्तावांबद्दल, जनतेने जून २०१५ पर्यंत आपले अभिप्राय कळवावेत अशी विनंती अर्थमंत्रालयाने आपल्या 'Website' वरून केली होती, तसेच जागतिक बँकेचा पाठिंबा असलेला, सरकारचा आवडता 'Digital India Initiative' हा उपक्रमसुद्धा डिजिटल अर्थव्यवस्थेच्या दिशेने पाऊले टाकली पाहिजेत असेच सुचवितो. या सर्वांचा अर्थ एकच

आणि तो म्हणजे 'आपल्या देशात सध्या जे काही घडत आहे, ते पूर्ण विचारांती रचलेल्या एका युक्तीबाज योजनेचीच परिणती आहे.'

एकीकडे सरकारची नोटाबंदीची कारवाई आणि तिच्या जोडीला जनतेला डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वळविण्याचा सरकारचा आटापीटा, हे दोन्ही उद्योग सरकारने, बचत करण्याविषयी जनतेची दिशाभूल करण्यासाठी चालू केले आहेत. उधळपट्टी व खर्चिक उपभोगवादी प्रवृत्ती वाढीस लागावी म्हणून हा सारा खटाटोप आहे.

तसेच विदेशी कॉर्पोरेट्सना आपल्या वित्तीय क्षेत्रात सहजगत्या शिरकाव करता यावा हा देखील डिजिटल अर्थव्यवस्थेमागचा हेतू आहे. आंतरराष्ट्रीय भांडवलासाठी आपल्या अर्थव्यवस्थेची दारे सताड उघडावीत म्हणून हे पहिले पाऊल उचलण्यात आल्याचे दिसते. डिजिटल अर्थव्यवस्थेचा विकास इलेक्ट्रॉनिक व्यापाराच्या (E.COmmerce) वाढीला सुद्धा हातभार लावतो. AMAZON सारख्या बलाढ्य 'ई-कॉमर्स' कंपन्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेचा नक्कीच मोठा फायदा होईल.

२०१६ सालच्या 'Mckinsey' अहवालानुसार - 'छोट्या, अनौपचारिक (Informal) उद्योगांवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेचा आवाका कमी करून, डिजिटल पद्धतीने देय रक्कम भरली तर महसूल आणखी वाढेल. कालांतराने इलेक्ट्रानिक व्यापार वाढेल व इंटरनेटवर मागणी करताच सेवा उपलब्ध होतील. परिणामी खर्च करण्याच्या ग्राहकांच्या नैसर्गिक प्रवृत्तीला भरपूर वाव मिळेल.'

देय रक्कमेसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करणे हे आजच्या आधुनिक काळातील पायाभूत सेवासुविधांचे एक महत्वाचे लक्षण आहे. ग्राहक म्हणून आपण आपला पैसा कसा खर्च करतो हे जाणून घेणे आधुनिक कॉर्पोरेट्ससाठी गरजेचे असते. आपला पैसा आपण कसा व कोणत्या वस्तूंसाठी खर्च करतो हे जेव्हा कॉर्पोरेट्स नेमके हेरतात तेव्हा आपल्या विशिष्ट आवडींना-इच्छांना साजेल अशा जाहिराती कॉर्पोरेट्स, सहजपणे तयार करतात. ग्राहक म्हणून कार्डामार्फत आपण खर्च केलेल्या रक्कमेच्या तपशीलाचा उपयोग करून, कॉर्पोरेट्स आपल्या वागण्याचा बारीक अभ्यास करतात व त्यांच्या मालाचे खरेदी करण्यास आपल्यावर चलाखीने दबाव आणतात.

आपल्या देशात डिजिटल पद्धती यशस्वीरित्या लागू करण्यासाठी आपली बँकखाती (बहुतांश भारतीयांसाठी जनधन खाती) आधारकार्ड आणि मोबाईल फोनचे संपर्क जाळे (Connectivity) यांची सांगड घातली पाहिजे. USAID ने याला 'JAM' हे नाव दिलेले आहे. सर्वप्रथम सर्वांसाठी बँकखाती उघडली जातील, 'बँकेतील ठेवी' (Bank Deposits) म्हणून त्या ख्यात्यांमध्ये पैसे जमा केले जातील. आधारकार्ड खातेदारांची माहिती (Data) गोळा करण्यासाठी वापरले जाईल व मोबाईलचा उपयोग डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी केला जाईल आणि हे सर्व केले जाईल कॉर्पोरेट्सच्या सेवेसाठी! आणि म्हणूनच सुप्रीम कोर्टाचा विरोध असताना देखील मोदी सरकारने आधारकार्ड सक्तीने करण्याचा जो निर्णय घेतला त्या निर्णयामागे कॉर्पोरेट्सची भलामण करणे हे खरे कारण होते. तसेच सर्व भारतीयांनी बँकखाते उघडलीच पाहिजेत या सरकारी निर्णयामागेसुद्धा हाच हेतू होता.

याचा अर्थ नोटाबंदीच्या नावाखाली, परंतु वस्तुत: डिजिटल अर्थव्यवस्थेकडे जाण्यासाठी मोदी सरकार विदेशी कॉर्पोरेट्सपुढे व वित्तीय भांडवलापुढे नतमस्तक होत आहे. तर दुसरीकडे ज्यांच्याकडे नगद पैसा आहे व जे डिजिटल अर्थव्यवस्थेकडे बळजबरीने जाण्यास विरोध करीत आहेत त्यांच्यावर 'देशद्रोही', 'देशविरोधी' आणि 'काळ्या पैशाची साठवणूक करणाऱ्यांना' पाठिंबा देणारे' असा शिक्का मारण्यात येत आहे.

## अर्थातच डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे सरकारचा देखील फायदा होत आहे –

★ देशाच्या पैशासंबंधीच्या धोरणावर (Monetary Policy) सरकार बऱ्यापैकी नियंत्रण ठेवू शकते व बँकांच्या व्याजाचे दर नियमित करणे सरकारला सोपे जाते.

★ सरकार, पैसा कसा फिरतो आहे? याचा शोध घेऊ शकते व 'अर्थव्यवस्थेची नाडी' ओळखून नवे कर ठरवू शकते.

★ फक्त काही विशिष्ट गटांना सरकारकडून अर्थसहाय्य मिळेल (Targeted delivery of Subsidies) असे धोरण स्वीकारून सरकार, देत असलेले अर्थसहाय्य कमी करू शकते. शेतकऱ्यांना व गरीब जनतेला मिळणारे अर्थसहाय्य कमी करण्याच्या उद्देशाने सरकार या नव्या धोरणाचा स्वीकार करीत असले तरी सरकारला सामान्य जनतेला मिळणारे अर्थसहाय्य (Subsidies) कायमचे थांबवायचे आहे.

नोटाबंदीच्या कारवाईमुळे रिझर्व्ह बँकेने आणि सार्वजनिक बँकांनी जनतेचा रोष स्वत:वर ओढवून घेतला व जनतेत खदखदणाऱ्या या असंतोषाला सरकारने जाणूनबुजून खतपाणी घातले. नोटाबंदीसंबंधीचे सर्व निर्णय सरकारनीच घेतले होते. तरीही निर्णयांची अंमलबजावणी करण्यात बँका सपशेल अपयशी ठरल्या. असा उलटा प्रचार केला जात होता. सरकारचे निर्णय व कृती यामुळे रिझर्व्ह बँक म्हणजे 'आपल्या ठेवीची हमी देणारी बँक' हा विश्वास ढासळू लागला. नोटाबंदीच्या संपूर्ण कालावधीत आपली मते ठामपणे मांडण्यात रिझर्व्ह बँक अपयशी ठरली व थट्टेचा विषय झाली. आपल्या स्वायत्ततेशी तडजोड करणारी एक संस्था म्हणून ती उदयास आली

चलनी नोटांचा जाचक तुटवडा चालू होता तेव्हा सर्वात आधी खाजगी बँकांना नवीन नोटांचा पुरवठा करण्यात येत होता व बहुतांश जनतेच्या गरजा पुरविणाऱ्या सार्वजनिक बँकांचा क्रम दुसरा होता. परिणामी सार्वजनिक बँकांवरची जनतेची चीड आणखी वाढली. परिस्थिती कठीण होती तरीही बँक कर्मचारी लोकांना मदत करण्यासाठी रात्रंदिवस झटत होते. या उलट मोदी सरकार आणि भाजप जनतेला सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांसाठी बँक कर्मचाऱ्यांनाच जबाबदार ठरवित आहेत.

आणि हे सारे सरकार मुद्दाम, जाणूनबुजून करीत आहे. केंद्रीय बँकेच्या अधिकारांमध्ये आणि स्वायत्ततेत मोदी सरकारला काटछाट करायची आहे. तसेच सार्वजनिक बँकांना बदनाम करण्याचा सरकारचा डाव आहे व ही सर्व तयारी सरकार आपल्या बँकिंग क्षेत्राचे खाजगीकरण करण्यासाठी करीत आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवल, आपल्या वित्तीय क्षेत्रामध्ये घुसखोरी करण्यासाठी टपून बसले आहे हे आपण विसरता कामा नये. त्यांच्यासाठी हे जरुरीचे आहे. जागतिक आर्थिक अरिष्टांचे परिणाम आजही तीव्रपणे जाणवत असताना, अधिक नफा लाटण्याचा आणि जागतिक अरिष्टामधून बाहेर

पडण्याचा हाच एक परिणामकारक मार्ग आहे असे त्यांना वाटते. व त्यांचा हा हेतू त्यांना साध्य करता यावा म्हणून आपल्या सरकारने नोटाबंदीचा घोळ घातला आहे. सार्वजनिक बँकांची बुडलेली कर्जे भरून काढण्यासाठी लोकांचा पैसा बँकेत जमा करून आणि जमाखर्चाचे हिशोब सुरळीत झाल्याचे दाखवून, आपल्या सार्वजनिक बँकांचा ताबा आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलांनी घ्यावा यासाठी मोदी सरकार तयारीला लागले आहे. याचा अर्थ सरकारला अभिप्रेत असलेली 'Big Bang' मोठी सुधारणा नोटाबंदीच्या माध्यमातून सरकार करू पहात आहे.

## नोटाबंदीच्या संदर्भात आपली भूमिका

देशाभिमानी, देशप्रेमी नागरिक या नात्याने नोटाबंदीची ही पूर्वनियोजित राजकारणी चाल उघडकीस आणणे हे सद्यपरिस्थितीत आपले प्राथमिक कर्तव्य आहे. नोटाबंदी म्हणजे नवउदारवाद आणि एकाधिकारशाही यांच्या सरमिसळीचे एक अस्सल उदाहरण. कार्पोरेट्सच्या फायद्यासाठी सामान्य जनतेवर नोटाबंदीचा हल्ला चढविला जात आहे. त्याचबरोबर जनतेच्या दैनंदिन गरजांची जरासुद्धा फिकीर न करता सरकारने 'कॅशलेस' अर्थव्यवस्थेच्या दिशेने पाऊले टाकायला सुरुवात केली आहे.

आपल्यापाशी, आपली स्वत:ची अशी रोख रक्कम असणे, आपल्या पैशाची बचत करणे व आपल्या पैशाचा वापर, आपल्या गरजा भागविण्यासाठी व आपल्या इच्छेनुसार करणे – या सर्व गोष्टी, आपले आर्थिक निर्णय आपण स्वत: घेण्याच्या आपल्या अधिकारात अंतर्भूत आहेत. शिवाय आपल्या समाजाच्या सांस्कृतिक जीवनाशी, रीतीरिवाजाशी निगडीत आहेत. असे असूनही मोदी सरकारची नोटाबंदी आपल्या आर्थिक अधिकारांवर, आपल्या सांस्कृतिक जीवनावर अतिक्रमण करीत आहे.

आपल्यापाशी असलेला पैसा हा आपला स्वकष्टार्जित पैसा आहे. आपल्याला पैशाची बचत करायची असेल तर सरकारने त्यासाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यायला हवेत. आपल्या खात्यांमधून आपल्याला पैसे काढायचे असतील तर सरकारने त्याची खात्रीलायक व्यवस्था करायला हवी. आपण किती रक्कम काढावी व ती कशा पद्धतीने खर्च करावी यासंबंधीचे हुकूम/आदेश काढण्याचा सरकारला अजिबात अधिकार नाही हा आपला पैसा आहे व त्यासंबंधीचे निर्णय आम्ही घेऊ.

लोक त्यांचा पैसा कसा खर्च करू इच्छितात –रोख नगद देऊन की कार्डाद्वारे हे लोकांनीच ठरवायचे आहे. लोकांनी रोखीचे व्यवहार करता कामा नयेत अशी सक्ती सरकारला करता येणार नाही. आपल्या सोयीनुसार लोकांना निर्णय घेता यावेत यासाठी सरकारने आवश्यक अशा सर्व संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. डिजिटल अर्थव्यवस्था बळजबरीने आपल्यावर लादली जाणार असेल तर ते आपण मुळीच मान्य करता कामा नये. त्याला कडाडून विरोध करायला हवा.

सार्वजनिक बँका आणि इतर वित्तीय संस्था ही सर्व भारतीयांची अनामत आहे. त्यावर सरकारचा मालकी हक्क नसतो. सरकारवर या मालमत्तेच्या व्यवस्थापनाचीच जबाबदारी असते. ही अनामत विदेशी किंवा खाजगी कॉर्पोरेट्सच्या हवाली करण्याचा सरकारला मुळीच अधिकार नाही. सार्वजनिक बँका व वित्तीय संस्था जनतेच्या हिताची कामे करीत आहेत; मोजक्या कार्पोरेट्चे हितसंबध जपण्यासाठी काम करीत नाहीत याची खबरदारी घेणे ही सरकारची जबाबदारी आहे. कॉर्पोरेट्सनी घेतलेल्या या सर्व कर्जाची त्यांनी वेळेवर परतफेड करावी म्हणून त्यांच्यावर दबाव आणणे व जे कॉर्पोरेट्स कर्जफेड करीत नाहीत त्यांची मालमत्ता ताब्यात घेणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

थोडक्यात नोटाबंदीला आमचा विरोध केवळ नोटाबंदीच्या नवउदारवादी अजेंड्यामुळे नाही तर नोटाबंदीच्या अंमलबजावणीत दिसून येणाऱ्या एकाधिकारशाही प्रवृत्तीमुळे आहे.

## या पार्श्वभूमीवर आम्ही पुढील मागण्या करीत आहोत–

१) आमच्या कष्टाच्या कमाईवरील आमचा हक्क आम्हाला मिळालाच पाहिजे.

२) आम्ही आमचा पैसा कसा वापरायचा - नगद वापरून की कार्डाच्या माध्यमातून हे ठरविण्याचा आमचा हक्क आम्हाला मिळालाच पाहिजे.

३) आपल्या सार्वजनिक बँकांना व इतर वित्तीय संस्थांना संरक्षण मिळालेच पाहिजे.

४) बँकांबाहेरील रांगांमध्ये उभ्या राहिलेल्या आणि तरीही पैसे न मिळालेल्या व अखेर प्राणास मुकलेल्या सर्वांना नुकसानभरपाई मिळालीच पाहिजे.

५) ग्राहकच न मिळाल्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या भाताची विक्री झाली नाही व हाती रोकड नसल्यामुळे ज्यांना नव्या हंगामात लागवड करता आली नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालीच पाहिजे.

६) छोटे व मध्यम उद्योग (SMES) बंद पडल्यामुळे रोजगार गमावून बसलेल्यांना नुकसानभरपाई मिळालीच पाहिजे.

७) भ्रष्टाचाराची प्रकरणे हाताळण्यासाठी केंद्रात लोकपालाची नेमणूक ताबडतोब झाली पाहिजे.

८) स्विस बँकेतील सर्व खातेदारांची नावे जाहीर करण्यात आली पाहिजेत व बेकायदेशीररित्या परदेशात साठवलेला पैसा परत आणलाच पाहिजे.

९) राजकीय भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी निवडणूक पद्धतीत सुधारणा केल्याच पाहिजेत.

## आमचा विरोध आहे –

★ आपल्याच बँक खात्यांमधून काढावयाच्या रक्कमेवर मर्यादा लादण्यास.

★ डिजिटल अर्थव्यवस्थेकडे सक्तीचे संक्रमण करण्यास.

★ कॉर्पोरेट्सनी घेतलेल्या कर्जावर पाणी सोडण्यास. (Write off)

★ आपले वित्तीय क्षेत्र विदेशी भांडवलदारांसाठी खुले करण्यास.

**(अनुवाद : शोभा ठेकेदत)**

# पाच राज्यांतील निवडणूक निकालांविषयी माकपचे निवेदन

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत तीन चतुर्थांश बहुमत मिळवून भाजपने निर्विवाद सत्ता स्थापन केली आहे. हा विजय त्यांना मुख्यत: धर्मांधतेचे आवाहन यशस्वीपणे केल्यामुळे तसेच जातीय समीकरण जुळवता आल्यामुळे मिळाल्याचे दिसून येते. नरेंद्र मोदी व त्यांच्या पक्षाला उत्तर प्रदेशात लोकसभा निवडणुकीत याच आधारावर बहुमत मिळाले होते. आजही राज्यात तीच परिस्थिती कायम असल्याचे या निकालावरून स्पष्ट होते.

भाजपला मतदारांनी दिलेला स्पष्ट कौल मान्य केला तरीही या विजयामुळे हिंदुत्ववादी राजकारणाला प्रोत्साहन मिळणार यात शंका नाही. असे होणे हे देशाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक व हानिकारक आहे.

भाजपने उत्तराखंड हे राज्य देखील प्रचंड विजय मिळवून काँग्रेसकडून हिसकावून घेतले आहे. पंजाब राज्यात मात्र अकाली दल-भाजप युतीचा सपशेल पराभव करून काँग्रेसने बाजी मारली आहे.

गोवा विधानसभेत भाजपला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. मात्र येनकेनप्रकारे सत्ता प्राप्त करण्याकरता त्यांचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. मणिपूर राज्यात काँग्रेसला आपले वर्चस्व राखता आलेले नाही.

★ ★ ★

# ‘खान्देशमधील साम्यवादी चळवळीची मीमांसा’ पुस्तकाचा जळगाव येथे प्रकाशन सोहळा

‘पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशभक्तीच्या नावावर कोणतेही निर्णय जनतेवर थोपवत असून, त्यांचे सर्व निर्णय हे केवळ सर्वसामान्यांवर आघात करणारे आहेत. त्यामुळे नरेंद्र मोदी यांनी केवळ श्रमिक, कामगार, शेतकऱ्यांनाच देशभक्ती शिकविण्याची गरज नाही. जे उद्योजक भारतातून पैसे घेऊन जात आहेत, भारतात राहून कामगारांचे शोषण करत आहेत, अशा उद्योजकांना मोदींनी आधी देशभक्ती शिकवावी’, असे उद्‌गार भाकपचे राज्य सचिव डॉ. भालचंद्र कांगो यांनी काढले.

प्राचार्य डी. एफ. पाटील लिखित ‘खान्देशातील साम्यवादी चळवळीची मीमांसा’ या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. भालचंद्र कांगो यांच्या हस्ते जळगाव येथे झाले. माकपचे ज्येष्ठ नेते कुमार शिराळकर, राज्य कमिटी सदस्य अजित अभ्यंकर व प्रकाश चौधरी, जिल्हा सचिव डॉ. कलावती पाटील, सीटूचे विजय पवार, प्राचार्य डी. एफ. पाटील. अमृत महाजन आणि पुस्तक प्रकाशित करणाऱ्या परिवर्तन अकादमीचे रविंद्र मोकाशी आदि यावेळी उपस्थित होते.

आपल्या भाषणात डॉ. कांगो पुढे म्हणाले, ‘सध्या सर्व उद्योगांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. त्यामुळे कामगार ही संकल्पना कमी होत आहे. भविष्यात तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे, तेव्हा साम्यवादी चळवळीने बेरोजगारांचे प्रश्न हाताशी घेऊन चळवळीची दिशा बदलून काम करण्याची गरज आहे. तसेच भविष्यात शेती हा रोजगार देणारा मुख्य व्यवसाय राहणार असून, शेतीकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.’

‘खान्देशातील साम्यवादी चळवळीची मीमांसा’ हे पुस्तक अनेक अंगांनी जागतिकीकरणाच्या नावाने होत असलेल्या हल्ल्यांच्या विरोधात कामगार कष्टकऱ्यांचा लढा उभारण्यासाठी स्फूर्ती देणारे आहे, असे गौरवोद्‌गारही त्यांनी काढले.

कुमार शिराळकर आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, खान्देशामध्ये देखील साम्यवादी चळवळ उभी राहिली. मात्र त्या चळवळीकडे इतिहासाने दुर्लक्ष केले आहे. काँग्रेसच्या फैजपूर अधिवेशनाशिवाय इतर उल्लेख




इतिहासात पहायला मिळत नाही. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पत्री सरकारने खान्देशात देखील उठाव केले. मात्र त्याचा कोठेही उल्लेख नाही. तसेच सध्याच्या काळात उजव्या विचारसरणीचा प्रभाव वाढत आहे. त्या विचारसरणीविरोधात नवी ताकद निर्माण करण्याचे आव्हान साम्यवादी चळवळीपुढे आहे. १९३६ पासून असलेल्या साम्यवादी चळवळीची माहिती उपस्थितांना देऊन हे पुस्तक साम्यवादी चळवळ पुढे नेण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरणार असल्याचे मनोगतही त्यांनी व्यक्त केले.

अजित अभ्यंकर कार्यक्रमात संबोधित करताना म्हणाले की, ‘साम्यवादी चळवळीचा इतिहास आजच्या युवकांना माहीत नाही. यासाठी इतिहास आजच्या युवकांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. कारण जे इतिहास विसरतात त्यांना भवितव्य नसते.’

जळगांव येथील नूतन मराठा महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय पवार हे होते, कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश चौधरी यांनी केले. प्रकाशक रविंद्र मोकाशी यांनी पुस्तक प्रकाशनासंबंधी माहिती देऊन यातील महत्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकला. आभार प्रदर्शन अमृत महाजन यांनी केले.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने इमारत बांधकाम कामगार, तसेच प्रतिष्ठित नागरिक, पुरोगामी व परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

**– प्राचार्य डी. एफ. पाटील**

# २०१६-१७च्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाने जिंकलेल्या जागा

| क्र. | जिल्हा | जिल्हा परिषद | पंचायत समिती | महानगरपालिका | नगरपालिका | एकूण जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे-पालघर | ५ | ११ | - | ११ | २७ |
| २. | नाशिक | ३ | ७ | - | ७ | १७ |
| ३. | सोलापूर | - | - | १ | - | १ |
| ४. | वर्धा | - | - | - | १ | १ |
| ५. | यवतमाळ | - | १ | - | - | १ |
| ६. | परभणी | - | १ | - | - | १ |
| ७. | बीड | - | १ | - | - | १ |
| | एकूण | ८ | २१ | १ | १९ | ४९ |

टीप : १. पक्षाने सुरगाणा नगर पंचायतीत ५ जागा व पेठ नगर पंचायतीत २ जागा जिंकल्या होत्या, त्याचा उल्लेख नजरचुकीने गेल्या 'जीवनमार्ग'मध्ये राहून गेला होता, ती दुरुस्ती येथे करत आहोत.

२. जिल्हा विभाजनामुळे ठाणे-पालघरमधील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जानेवारी २०१५ मध्ये, २०१४च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर झाल्या होत्या.

# २०११-१२च्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाने जिंकलेल्या जागा

| क्र. | जिल्हा | जिल्हा परिषद | पंचायत समिती | महानगरपालिका | नगरपालिका | एकूण जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे-पालघर | ४ | ८ | - | - | १२ |
| २. | नाशिक | ३ | ५ | ३ | - | ११ |
| ३. | सोलापूर | - | - | ३ | - | ३ |
| ४. | नंदुरबार | १ | १ | - | - | २ |
| ५. | परभणी | - | १ | - | - | १ |
| ६. | नांदेड | - | १ | - | - | १ |
| ७. | बुलडाणा | - | १ | - | - | १ |
| | एकूण | ८ | १७ | ६ | ० | ३१ |